ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यमापन प्रक्रियेतील बदल अभ्यासणे.

***शैलेश गायकवाड व **डॉ. राजश्री मेश्राम**

** पी.एचडी (शिक्षणशास्त्र) प्रशिक्षणार्थ, **विभाग प्रमुख एशिक्षणशास्त्र विभाग, क. का. सं. विद्यापीठ, रामटेक*

**गोषवारा:**

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार करण्यात येण्याऱ्या सर्व स्तरावरील अभ्यासक्रम आणि अध्यापनातील सुधारणांचा मुख्य भर समाज वाढवण्याच्या आणि कसे शिकवायचे आणि कसे शिकायचे तसेच ते शिकण्याच्या दिशेने व सध्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या पाठांतर संस्कृतीच्या घोकंपट्टीच्या शिक्षणापासून शिक्षणव्यवस्थेला दूर नेणे यावर आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ आकलनात्मक विकास करणे एवढेच नसून चांगले व्यक्तिमत्व घडविणे आणि एकविसाव्या शतकातील प्रमुख कौशल्य आत्मसात केलेल्या समग्र व अष्टपैलू व्यक्ती निर्माण करणे हे देखील एक उद्दिष्ट आहे. त्यामुळे ज्ञानाच्या अथांग अशा सागराचे मंथन करण्याच्या दिशेने टाकलेले पाउल आहे. शिक्षण हे एखाद्या व्यक्तीमध्ये आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या परिपूर्णतेच्या रूपात ज्ञानाची अभिव्यक्त करण्यास मदत करते. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्यास चालना मिळते. शिक्षणाची ही महत्त्वाची उद्दिष्टे गाठण्यासाठी अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रातील मूल्यमापनाच्या सर्व पैलूची पुर्नरचना केले जाण्यावर भर आहे.*

*पूर्व प्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत शिकण्याच्या प्रत्येक टप्प्यावर एकात्मीकरण आणि समावेशन करण्यासाठी विविध क्षेत्रांमधील विशिष्ट कौशल्य आणि मूल्य निश्चित केले जातील. शिकविण्याच्या आणि शिकण्याच्या रंजक प्रक्रियांद्वारे ही कौशल्य आणि मूल्ये आत्मसात केले जातील हे सुनिश्चित करण्यासाठी अभ्यासक्रम आराखडा आणि व्यवहार पद्धती विकसित केल्या जातील. एनसीईआरटी ; ही संस्था आवश्यक कौशल्य निश्चित करेल आणि त्यांच्या व्यवहार पद्धती बालपणीच्या व शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखडयामध्ये समाविष्ट करेल अशी ही दूरदृष्टी असलेली संकल्पना 2020 मध्ये आहे.* ***शब्दावली** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी, मूल्यमापन प्रक्रिया*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना:** शैक्षणिक मापनाचे उद्देश विद्यार्थ्यांच्या कमाल कामगिरीचे मापन करणे हा आहे. म्हणजे वर्तणूक आणि संपादन चाचण्या सारख्या वेगवेगळ्या चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांची क्षमता ठरविणे. येथे विद्यार्थ्याला काहीतरी कार्य करण्यासाठी प्रेरित

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

केले जाते. मापनाच्या स्वरूपावर आधारित शैक्षणिक मापनाचे खालील दोन मुख्य हेतू आहेत 1)कमाल कामगिरीचे मापन करणे आणि 2) विशिष्ट कामगिरीचे मापन करणे.

विशिष्ट कामगिरीत एखादी व्यक्ती नैसर्गिक परिस्थितीत काय करेल हे ठरवणे हा उद्देश असतो. यात विद्यार्थ्याला काहीही करण्यासाठी प्रेरित केले जात नाही तो त्याच्या आवडीनुसार कार्य करतो. उदाहरणार्थ एखाद्या विद्यार्थ्याला चांगल्या खेळाडूचे नियम माहीत आहेत जो ते पाळायला नकार देऊ शकतो आणि तो ते करू शकतो परंतु त्याला ते करण्याची आवड नाही हे त्याचे विशिष्ट वर्तन झाले. म्हणून शैक्षणिक मापनाचा उद्देश हा विद्यार्थ्यांची कमाल कामगिरी आणि विशिष्ट कामगिरी मोजणे हे कार्य आहे.

**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**: विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय आहे. ध्येय हे एकदम एका टप्प्यात गाठता येणार नाही. ध्येय हे दूरगामी स्वरूपाचे असते, तर ध्येयाप्रत जाणारी प्रत्येक पायरी म्हणजे एकेक उद्दिष्ट्य असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात भाषांचा योग्य वापर करता येणे ,निरीक्षण ,तर्कशुद्ध विचार करता येणे,दुसऱ्यांचे विचार व भावना समजावून घेणे,नवनवीन कल्पना आणि विचार मांडता येणे,दैंनदिन जीवनातील विविध व्यवहार - खरेदी-विक्री,बँक व पोस्ट - ऑफिस यांचे व्यवहार करता येणे विविध कौशल्ये व चांगल्या सवयी आत्मसात करणे या अनेक बाबींचा विचार केलेला असतो.

प्राथमिक वर्गापासून ते दहावीपर्यंतच्या कालावधीत शिक्षणाच्या प्रत्येक पायरीवर विद्यार्थी जे काही आत्मसात करतो त्या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे सर्वांगीण विकास होय. या सर्वांगीण विकासातील प्रत्येक टप्पा ठराविक कालावधीत साध्य होतोच असे नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात उद्दिष्ट्ये हि महत्वाची भूमिका बजावतात .

समाजात विशिष्ट प्रसंगी कसे वागले पाहिजे याचे शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात इष्ट बदल होईल आणि इष्ट वर्तनाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये ‘‘विकास होणे म्हणजे शिक्षण होय’’. शाळा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे माध्यम आहे. सर्वांगीण विकासामध्ये विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होतो. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या शारीरिक व मानसिक क्षमतांना ओळखून त्यांच्या विकासाच्या दृष्टीने केलेला प्रयत्न म्हणजे सर्वांगीण विकास होय.

- **मूल्यमापनाचा हेतू:**

  मूल्यमापनाचा हेतू शालेय कार्यक्रमातील बऱ्याच वस्तुस्थितीत मूल्यमापन महत्त्वाची भूमिका बजावते ते अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रत्यक्षपणे राबविण्यात योगदान देते. ते वर्गातील वर्गाध्यापन, अभ्यासक्रम विकास, गुणदान आणि अहवाल, मार्गदर्शन आणि सल्लामसलत शालेय कारभार आणि संशोधन यामध्येसुद्धा वापरले जाते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

जे. एच. एहमन आणि एम. डी. म्लॉक यांच्यानुसार ''मूल्यमापनाचा सर्वसाधारण उद्देश म्हणजे शाळेच्या शैक्षणिक उद्देशाच्या चौकटीत प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार विकसित करण्याकरिता सक्षम बनविण्यासाठी माहिती पुरवणे.''

बेंजामिन ब्लूम यांच्यानुसार ''मूल्यमापनाचे हेतू म्हणजे विद्यार्थ्यांने त्याच्या दैनंदिन कार्याची सुरुवात करण्यात ते सुसंघटित करण्यात आणि प्रगती करण्याकरिता विकसित केलेल्या कार्यक्षमतेचे प्रमाण शोधून कमकुवतपणा चे निदान करणे.''

शिक्षणाची मूलभूत उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने मूल्यमापनाचे खालील चार प्रमुख हेतू आहेत

- वर्गातील किंवा वर्गाच्या विभागातील विद्यार्थ्यांचे त्यांच्या काही विषय क्षेत्रातील ज्ञान किंवा क्षमतेनुसार वर्गीकरण करणे.
- वैयक्तिक रित्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कमकुवतपणा चे निदान करणे जेणेकरून त्याच्याकरिता उपचारात्मक कार्याची आखणी केली जाऊ शकते आणि त्याच्यासाठी अध्यापन तंत्राची पुर्नआखणी केली जाऊ शकते.
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे वेळोवेळी मूल्यांकन करणे.
- विद्यार्थ्यांच्या भावी शैक्षणिक यशाचे निदान करणे.
- सातततत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा हेतू

शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि. १० मे २०१० अन्वये बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला आहे. त्यानुसार इयत्ता आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही बोर्डाची परीक्षा द्यावी लागणार नाही. सदर अधिनियमामधील कलम २९ (१) व (२) नुसार सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीसाठी पुढीलप्रमाणे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपद्धती विहित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्व पैलूंचे सातत्याने आणि विविध अंगाने मूल्यमापन करण्यासाठी वापरावयाची शाळा स्तरावरील कार्यपद्धती म्हणजे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन होय. त्यामध्ये दोन प्रकारच्या उद्दिष्टांवर भर देण्यात आला होता. त्यापैकी पहिले उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या व्यापक अध्ययन प्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि दुसरे उद्दिष्ट वर्तनातील किंवा वर्तन निष्पत्ती

सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनामध्ये आकारिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पद्धतींचा समावेश करण्यात आला होता.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

- **आकारिक मूल्यमापन:(Formative Evaluation):**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दिक, भावनिक असा सर्वांगीण विकास होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे आकाराला येत आहे हे नियमितपणे पडताळून पाहाणे म्हणजेच आकारिक मूल्यमापन. शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आकारिक मूल्यमापनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचे आकारिक मूल्यमापन गांभीर्याने करणे आवश्यक आहे.

१. मूल्यमापनाचा विचार जीवन कोशल्यांच्या अंगाने करावा. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, शोधक वृत्ती. चिकित्सक वृत्ती. सर्जनशील विचार करण्याची क्षमता, संवेदनशीलता, विद्यार्थ्यांचे परस्परांशी असलेलं संबंध, सहज संवाद साधण्याची क्षमता, ताणतणावांना तोंड देण्याची भावनिक ताकद या सर्व गोष्टींची दखल घ्यावी. ही सर्व कौशल्ये विद्यार्थ्याच्या वर्तनात दृश्य स्वरुपात येण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांशी वेळोवेळी सुसंवाद साधावा. त्यामुळे शिक्षण प्रक्रिया उद्दिष्टानुरुप व जीवनाभिमुख होण्यास मदत होईल. आकारिक मूल्यमापनामधून संविधानातील मूल्ये, गाभाघटक व जीवन कौशल्ये यांचे मूल्यमापन व्हावं.

2. प्रत्येक सत्रातील आकारिक मूल्यमापनामध्ये सातत्य राहावे. वरील आकारिक मूल्यमापनाच्या आठ साधन-तंत्रांपैकी विषय व उद्दिष्टानुसार उपयुक्त मूल्यमापन ऽसाधनाद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात यावे. कला, कार्यानुभव आणि शारीरिक शिक्षण व आरोग्य या विषयांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. शिक्षणप्रक्रिया जीवनाशी जोडली जाते व मूल्यांचा परिपोष होतो. त्यामुळे या विषयांचे मूल्यमापन योग्यप्रकारे करुन विदयार्थ्याना प्रेरणा व प्रोत्साहन द्यावे.

- **संकलित मूल्यमापन:**

संकलित मूल्यमापन प्रथम व द्वितीय सत्राच्या अखेरीस लेखी, तॉडी, प्रात्यक्षिक स्वरुपात करण्यात यावे. लेखी स्वरुपातील साधनांमध्ये मुक्तोत्तरी प्रश्नांचा अधिक वापर करण्यात यावा. संविधानातील मूल्ये, गाभाघटक, जीवन कौशल्ये व दूरगामी उद्दिष्टे या संदर्भातील मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने विचार करण्यात यावा.

१. पहिले संकलित मूल्यमापन प्रथम सत्राच्या अखेरीस व दुसरे संकलित मूल्यमापन द्वितीय सत्राच्या अखेरीस तोंडी प्रात्यक्षिक वर्ग स्तरावर व शाळा स्तरावर शिक्षक व मुख्याध्यापक यांनी ठरवून करावे.

२. संपूर्ण शिक्षण प्रक्रियाच आनंददायी असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला आपली मते मुक्तपणे व सहजतेने देता येतील व व्यक्त करता येतील अशा रीतीने मूल्यमापन करावे. मूल्यमापनामुळे मुलांना भीती. दडपण वाटणार नाही याची दक्षता

घ्यावी.

संकलित मूल्यमापनासाठी साधने तयार करताना विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ती, सर्जनशीलता आणि बहुविध बुध्दीमत्तेला वाव ठेवावा. त्यासाठी आवश्यकतेनुसार मुक्तांत्तरी प्रश्नांचा उपयोग करावा. यांत्रिक प्रतिसाद, घोकंपट्टी यावर भर देणाऱ्या आणि स्मरणावर आधारित प्रश्नांना वाव देऊ नये. मूल्यमापनातून निदर्शनास आलेल्या उल्लेखनीय बाबी तसेच वैयक्तिक गुणांची आवर्जून दखल घ्यावी आणि विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन अशा गुणांच्या विकासासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

- **मूल्यमापनातील काही समस्या**:

विद्यार्थ्यांचे मुल्यांकन काही वेळेस अंतर्गत तर कधी बाहय पद्धतीने करावे लागत असते. बरेचदा यामध्ये काही समस्या जाणवतात. त्या पुढील प्रमाणे आहेत-

- निश्चित ध्येयाचा अभाव
- अभ्यासक्रम पूर्ण करणे व नेमून देण्यासंबंधी सूचनांचा अभाव
- तज्ञ व्यक्तींचा अभाव
- योजनांचा अभाव
- शैक्षणिक दर्जाची घसरण इत्यादी

अशासारख्या बऱ्याच समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी मूल्यमापन प्रक्रियेत व एकूणच परिक्षा पद्धतीत बदल करण्यात सुचविले आहेत.

- **संशोधनाची उद्दिष्टे:**

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी मूल्यमापन प्रक्रिया जाणून घेणे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता मूल्यमापन पद्धतीतील घटकांमध्ये केलेले बदल जाणून घेणे
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परीक्षा पद्धतीत केलेले बदल जाणून घेणे.
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या मूल्यमापनाचे टप्पे जाणून घेणे
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील शाळांच्या मूल्यमापन मूल्यांकनासाठी करण्यात आलेल्या तरतुदी जाणून घेणे

**संशोधन पंद्धती व साधने**:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे एक लिखित असे दस्तऐवज असल्यामुळे संशोधकाने या मध्ये दस्तऐवज पृथ्थकरण पद्धतीचा वापर केलेला आहे. या शिवाय प्रस्तूत संशोधनाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याकरिता संशोधकाने भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालया द्धारे प्रकाशित तसेच महाराष्ट्र शासनाद्धारे प्रकाशित मसूदा 2019 तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 बाबत विविध मासिकातील लेखांच्या आधारे उद्दिष्टांचे अर्थनिर्वचन केले आहे.

**विश्लेषण व निष्कर्ष:**

**उद्दिष्ट क्र. 1 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यमापन प्रक्रियेतील बदल जाणून घेणे.**

**विश्लेषण -** आपल्या देशातील शालेय व्यवस्थेच्या संस्कृतीमधील मूल्यमापन, सारांश पध्दतीचे आहे- जे मुख्यत्वे घोकंपट्टी करून लक्षात ठेवण्याच्या कौशल्याची पारख करते. या मूल्यमापनाच्या उद्दिष्टात बदल करून ते अधिक नियमित आणि रचनात्मक केले जाईल. जे विविध क्षमतांवर आधारित असेल, विद्यार्थ्यांसाठी अध्ययन आणि विकासाला प्रोत्साहन देणारे आणि उच्च-स्तरावरील कौशल्ये उदा. विश्लेषण, तार्किक विचार आणि संकल्पनात्मक सुस्पष्टता, यांची पारख करणारे असेल. मूल्यमापनाचा प्रमुख उद्देश खरोखरीच अध्यापनासाठी असेल याचा फायदा शिक्षक, विद्यार्थी आणि संपूर्ण शालेय व्यवस्थेला अध्यापन अध्ययन प्रक्रियेमध्ये सतत बदल करायला मदत होईल जेणेकरून सर्व विदयार्थीकरिता शिक्षण आणि विकास यांना चालना मिळेल. सर्व शैक्षणिक स्तरावरील मूल्यमापनाचे हे मूलभूत तत्त्व असेल.

**उद्दिष्ट क्र. 2 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विदयार्थच्या सर्वांगीण विकासाकरीता मूल्यमापन पद्धतीतील घटकांमध्ये केलेले बदल जाणून घेणे.**

**विश्लेषण** - शाळेकडून पालकांना कळवल्या जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या शाळा-आधारित मूल्यमापनाच्या प्रगती पुस्तकाची संपूर्ण पुनर्रचना राज्ये/केंद्रशासित प्रदेशांतर्फे प्रस्तावित राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र, NCERT आणि SCERT यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाईल. हे प्रगती पुस्तक एक सर्वांगीण, व्यापक (360 अंश), बहुआगामी अहवाल असेल व या अहवालामध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची आकलनीय (Cognitive ), भावात्मक (|Affective ) आणि सायकोमोटर ;(Psycomotor ) क्षेत्रातील प्रगती तसेच विशेषता इत्यादी बाबी अतिशय तपशीलवारपणे दर्शविल्या जातील. यामध्ये शिक्षकाच्या मूल्यमापनासह स्व मूल्यमापन, सहाध्यायी-मूल्यमापन तसेच प्रकल्प आणि अन्वेषणावर आधारित अध्ययन प्रश्नमंजुषा, नायीकरण, सांघिक कार्य, पोर्टफोलिओज इ. मध्ये विद्यार्थ्याने केलेली प्रगती या सर्वांचा समावेश असेल. सर्वांगीण प्रगती पुस्तक हे घर आणि शाळा यातील महत्त्वाचा दुवा असेल आणि त्याच्या जोडीने पालक-शिक्षक बैठकादेखील घेतल्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

जातील जेणेकरून पालकांना आपल्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षणामध्ये आणि विकासामध्ये सक्रियपणे सहभागी करून घेता येईल. AI तंत्रज्ञानावर आधारित सॉफ्टवेअर विकसित करण्यात येईल जे अध्यापनाचा डेटा/माहिती आणि पालक, विद्यार्थी व शिक्षकांसाठी असलेल्या परस्परसंवादी प्रश्नावलींवर आधारित असेल आणि त्याचा वापर करून शालेय वर्षामध्ये होणाऱ्या स्वतःच्या विकासावर विद्यार्थ्यांना लक्ष ठेवता येईल. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांनी कुवत, आवडीची क्षेत्रे आणि लक्ष केंद्रित करायची गरज असलेली क्षेत्रे याविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळेल. या माहितीचा वापर करून त्यांना स्वतःसाठी करिअरचे सर्वोत्कृष्ट पर्याय निवडायला मदत होईल.

**उद्दिष्ट क्र. 3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परीक्षा पद्धतीत केलेले बदल जाणून घेणे.**

**विश्लेषण** - बोर्डाची परीक्षा आणि इतर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसह माध्यमिक शाळेच्या परीक्षांचे विद्यमान स्वरूप आणि परिणामी बोकाळलेली आजची कोचिंग संस्कृती याने बरीच हानी होत आहे. विशेषतः माध्यमिक शाळेच्या स्तरावर यामुळे विद्यार्थ्यांचा यथायोग्य अध्ययनासाठी असलेला वेळ, परीक्षांसाठी लागणारे अतिरिक्त कोचिंग आणि तयारी यामध्ये हानी होते . विद्यार्थ्यांना वेगवेगळे पर्याय आणि त्यात निवड करण्याची लवचिकता जी भविष्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे देण्याऐवजी या परीक्षांमुळे मुलांना एकाच शाखेतील अतिशय मर्यादित साहित्याचा अभ्यास करायला भाग पाडले जाते,

इयत्ता 10 आणि 12 साठी असणाऱ्या बोर्ड परीक्षा तशाच चालू राहणार असल्या तरी विद्यमान बोर्ड आणि प्रवेश परीक्षांच्या व्यवस्थेत अशा बदल करण्यात येईल की कोचिंग क्लासला जाण्याची गरज भासणार नाही. विद्यमान मूल्यमापन प्रणालीमुळे झालेले हे हानिकारक परिणाम उलट करण्यासाठी, बोर्ड परीक्षांनी पुनर्रचना केली जाईल, जेणेकरून सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन मिळेलः आपल्या वैयक्तिक आवडीनुसार विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी बोर्डाची परीक्षा द्यायची आहे. त्यातील बरेचसे विषय त्यांना निवडता येतील. बोर्ड परीक्षा अधिक सोप्या देखील केल्या जातील, म्हणजे महिनोन महिने केलेले कोचिंग आणि घोकंपट्टीच्याऐवजी प्रामुख्याने मुख्य क्षमतायोग्यतेची पारख केली जाईलः शाळेच्या वर्गात बसणाऱ्या आणि प्राथमिक प्रगत करणार्या कोणत्याही विद्यार्थ्याला कोणतेही अतिरिक्त कष्ट न घेता बोर्ड परीक्षेच्या सर्व विषयात उत्तीर्ण होता येईल आणि चांगली कामगिरी करता येईल.

**उद्दिष्ट क्र.4 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या मूल्यमापनाचे टप्पे जाणून घेणे.**

**विश्लेषण** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये फक्त दहावी आणि बारावीच्या परीक्षा पद्धतीमध्ये बदल केलेला नसून संपूर्ण

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–X, ISSUE– VI NOV – DEC 2023

Original Research Article

शालेय शिक्षणा मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी इयत्ता 3 ते 5 आणि आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना योग्य प्राधिकरणामार्फत घेतली जाणारी आणि शाळेची परीक्षा द्यावी लागेल. यामुळे शाळा आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया मध्ये सुधारणा करण्याकरिता विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक आणि संपूर्ण शालेय यंत्रणेला फायदा होईल. कारण या परीक्षा घोकंपट्टीवर भर न देता मूलभूत अध्ययन निष्पत्ती झाली की नाही याची पारख करणाऱ्या असतील. प्रमुख संकल्पनांचे मूल्यमापन आणि राष्ट्रीय व स्थानिक अभ्यासक्रमांचे ज्ञान तसेच प्रसंगनिहाय उच्चस्तरीय कौशल्ये आणि प्रत्यक्ष जीवनात ज्ञानाचा केलेल्या वापर यावरून ही पारख करण्यात येईल. विशेषतः इयत्ता तिसरीच्या परीक्षे मध्ये प्राथमिक साक्षरता, संख्याज्ञान आणि पायाभूत कौशल्यांची पारख करणाऱ्या असतील. शालेय परीक्षांच्या निकालाचा वापर फक्त शालेय शिक्षण व्यवस्थेच्या विकासासाठी केला जाईल. तसेच शाळेतर्फे विद्यार्थ्यांच्या एकूण निकालाचे जाहीर प्रकटीकरण करण्याकरिता आणि शालेय व्यवस्थेवर सतत देखरेख ठेवण्याकरिता आणि त्यात सुधारणा करण्याकरिता देखील केला जाईल.

**उद्दिष्ट क्र.5 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील शाळांच्या मूल्यमापन मूल्यांकनासाठी करण्यात आलेल्या तरतुदी जाणून घेणे.**

**विश्लेषण** - सद्यस्थितीत वेगवेगळ्या प्राधिकरणामार्फत शाळांचे मूल्यमापन मूल्यांकन केले जाते यामध्ये विविध घटकांची तपासणी करून शाळांना नामांकन दिले जाते परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये या बाबतीत काही महत्त्वपूर्ण बदल केले आहेत

MHRD अंतर्गत एक मानक निश्चिती संस्था म्हणून राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र, PARAKH (परफॉर्मन्स असेसमेंट, रिव्ह्यू अँड ॲनालिसिस ऑफ नॉलेज फॉर होलिस्टिक डेव्हलपमेंट) म्हणजेच सर्वांगीण विकासासाठी कामगिरीचे मूल्यांकन, समीक्षा आणि ज्ञानाचे विश्लेषण स्थापन करणे प्रस्तावित आहे. भारतातील सर्व मान्यताप्राप्त शाळा मंडळांसाठी, विद्यार्थ्यांचे मूल्यांकन व मूल्यमापन करण्यासाठीचे निकष, मानके आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, राज्य निष्पत्ती सर्वेक्षण (स्टेट अचिव्हमेंट सर्व्हे SAS) करण्यास मार्गदर्शन करणे आणि राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षण (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे NAS) करणे, देशातील अध्ययन निष्पत्तीच्या कामगिरीवर देखरेख करणे आणि या - धोरणात नमूद उद्दिष्टांच्या अनुरूप 21व्या शतकात आवश्यक असलेल्या कौशल्यांची पूर्तता करण्याच्या हेतूने शाळा मंडळांना त्यांचे मूल्यांकन नमुने स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित व मदत करणे. ही मूलभूत उद्दिष्टे हे केंद्र पूर्ण करेल. हे केंद्र नवीन मूल्यांकन नमुन्यांविषयी आणि ताज्या संशोधनांबाबत शाळा मंडळांना सल्ला देईल. शाळा मंडळांमधील सहयोगांना प्रोत्साहन देईल. शाळा मंडळांमधील सर्वोत्कृष्ट पद्धती शेअर करण्यासाठी आणि सर्व शाळा मंडळांमधील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक मानकांची समानता सुनिश्चित करण्यासाठी देखील हे केंद्र एक साधन बनेल.

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधनात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यमापन

प्रक्रियेतील बदल या प्रकरणात दिलेल्या माहितीच्या अध्ययना नुसार ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टांचे विश्लेषण केले असता काही निष्कर्ष काढण्यात आले ते पुढील प्रमाणे.

1. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे विविध क्षमतांवर आधारित त्यांना अध्ययन प्रवृत्त करणारे आणि विकासाला प्रोत्साहन देणारे तसेच त्यांच्या उच्च-स्तरावरील कौशल्ये यांची पारख करणारे असेल. हे सर्व शैक्षणिक स्तरावरील मूल्यमापनाचे मूलभूत तत्त्व असल्याचे लक्षात येते.
2. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद आधूनिक तंत्रज्ञानावर आधारित अहवाल पुस्तकात करण्यात येईल. अहवालामध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची मानसिक, भावनिक आणि बौद्धिक क्षेत्रातील प्रगती तसेच विशेषता इत्यादी बाबी अतिशय तपशीलवारपणे दर्शविल्या जातील. यामध्ये शिक्षकाच्या मूल्यमापनासह स्व मूल्यमापन, सहाध्यायी-मूल्यमापन इ. मध्ये विद्यार्थ्याने केलेली प्रगती या सर्वाचा समावेश असेल.याद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे मार्ग शोधण्यास मदत होईल असे वाटते.
3. परिक्षा पद्धतीत केले जाणारे बदल हे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या दृष्टिने योग्य असेच आहेत कारण या बदलांमुळे घोकंपट्टीच्याऐवजी प्रामुख्याने मुख्य क्षमता व योग्यतेची पारख केली जाईल. तसेच परिक्षा पद्धतीतील बदलामुळे कोचिंग संस्कृतीला आळ बसेल त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर परिक्षांबाबत असलेला अवास्तव ताण कमी होण्यास मदत होईल असे वाटते.
4. संपूर्ण शालेय शिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी इयत्ता 3 ते 5 आणि आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना योग्य प्राधिकरणामार्फत घेतली जाणारी आणि शाळेची परीक्षा द्यावी लागेल. यामुळे शाळा आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिये मध्ये सुधारणा करण्याकरिता विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक आणि संपूर्ण शालेय यंत्रणेला फायदा होईल.
5. भारतातील सर्व मान्यताप्राप्त शाळा मंडळांसाठी, विद्यार्थ्यांचे मूल्यांकन व मूल्यमापन करण्यासाठीचे निकष, मानके आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, राज्य निष्पत्ती सर्वेक्षण (स्टेट अचिव्हमेंट सर्व्हे SAS) करण्यास मार्गदर्शन करणे आणि राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षण (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे NAS) करणे या करिता PARAKH (परफॉर्मन्स असेसमेंट, रिव्ह्यू अँड ॲनालिसिस ऑफ नॉलेज फॉर होलिस्टिक डेव्हलपमेंट) या राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राची स्थापना करणे प्रस्तावित असल्याचे लक्षात येते.

**संदर्भ सूची:**

1. मनुष्यबळ विकास मंत्रालय अहवाल (मराठी), नवी दिल्ली/ मुंबई, दिनांक 29 जुलै 2020.

2. पाचवी पर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून, द वायर प्रतिनिधी, 30जुलै 2020
3. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
4. शासन निर्णय दि. 20/08/2010 महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019, मसुदा सारांश-www.mhrd.gove.in
6. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020.
7. पंढरी विलास, 07 ऑगस्ट 2020, नवीन शैक्षणिक धोरण - अपेक्षा आणि वास्तव,
8. डॉ. हरिचंदन धनेश्वर व इतर, ;2015द्धतृतीय वर्ष कला, अभ्यास पत्रिका-सहा, शैक्षणिक मूल्यमापन, मुंबई: दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ

***Cite This Article:***

**Gaikwad S. & Dr. Meshram R. (2023).** RASHTRIYA SHAIKSHANIK DHORAN 2020 MADHIL VIDYARTHYANCHYA SARVANGIN VIKASASATHI MULYAMAPAN PRAKRIYETIL BADAL ABHYASANE. In Educreator Research Journal: Vol. X (Number VI, pp. 61–70). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10499303